# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:08.05.2025** **वार:गुरुवार**

---

1. पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधे भारतीय संरक्षण दलानं राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरमधे दहशतवाद्यांचे 9 तळ उद्धवस्त.
2. ऑपरेशन सिंदूर यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल सशस्त्र दलांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं कौतुक.
3. ऑपरेशन सिंदूरला जगभरातील विविध देशांसाह तसच देशातील राजकीय पक्षांसह सामन्यांचा पाठिंबा.
4. खेलो इंडिया युवा स्पर्धेत महाराष्ट्र 13 सुवर्णपदकांसह पदकतालिकेत पहिल्यास्थानी. आणि
5. कसोटी क्रिकेटमधून रोहित शर्माची निवृत्तीची घोषणा.

**<u>सिंदूर</u>**

पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधे भारतीय संरक्षण दलानं राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरमधे दहशतवाद्यांचे 9 तळ उद्धवस्त करण्यात आले. परराष्ट्र व्यवहार विभागाचे सचिव विक्रम मिस्त्री, भारतीय लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि हवाई दलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी दिल्लीत झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पाकिस्तानच्या कोणत्याही नागरी वस्तीला किंवा पाक लष्कराला धक्का न लावता पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडितांना न्याय देण्यासाठी ऑपरेशन सिंदूर मोहीम राबवल्याचं विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी सांगितलं. या मोहिमेबाबत अधिक माहिती देताना विंग कमांडर व्योमिका सिंग म्हणाल्या...

**The strikes on the terror camps were undertaken through precision capability as shown to you. A niche technology weapons with careful selection of warheads was ensured so that there will be no collateral damage. The point of impact in each of the targets was a specific building or a group of buildings. All the targets were neutralized with clinical efficiency. And the results reiterate the professionalism of the Indian armed forces in the planning and execution of their operations. No military establishments were targeted. India has demonstrated considerable restraint in its response. However, it must be said that the Indian armed forces are fully prepared to respond to Pakistani misadventures, if any, that will escalate the situation.**

पाकिस्ताननं यापुढे कोणतीही आगळीक केली, तर भारतीय सैन्य पूर्णपणे तयार असल्याचा सज्जड इशारा भारतानं दिला आहे.

ऑपरेशन सिंदूर नंतर केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथं झाली. मंत्रिमंडळ सदस्यांनी या मोहिमेबद्दल मोदी यांचं अभिनंदन केलं आणि त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. त्यानंतर पंतप्रधानांनी दुपारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन त्यांना ऑपरेशन सिंदूरबद्दल माहिती दिली.

**सिंदूर-प्रतिक्रिया**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूर यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल सशस्त्र दलांचे कौतुक केलं आहे.

पहलगाममध्ये देशातल्या निरपराध बांधवांच्या निर्घृण हत्येला भारतानं दिलेली प्रतिक्रिया म्हणजे ऑपरेशन सिंदूर आहे असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे.

सशस्त्र दलांनी अचूकता, सावधगिरी दाखवून इतिहास रचला असून या कारवाईदरम्यान कोणत्याही सामान्य नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घेतल्याचं संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी सांगितलं.

जगानं दहशतवादाबाबत शून्य सहिष्णुता धोरण दाखवलं पाहिजे असं मत परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी व्यक्त केलं आहे.

काँग्रेस दहशतवादाविरोधात कोणतीही निर्णायक कारवाई करण्यासाठी लष्कर आणि सरकारच्या पाठीशी ठामपणे उभी आहे असं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पुण्यात पत्रकारांशी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांचं कौतुक केलं. सरकार कोणतीही भूमिका घेत असताना राजकारण न आणता पूर्ण ताकदीनं सरकारच्या पाठिमागं उभं राहिलं पाहिजे असं आवाहन शरद पवार यांनी यावेळी केलं.

या मोहिमेबद्दल विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लष्काराबद्दल अभिमान व्यक्त केला आहे. तर ए आय एम आय एम चे खासदार असदुद्दीन औवेसी यांनीही भारतीय लष्कराचं अभिनंदन केले.

**सर्वपक्षीय बैठक**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आज नवी दिल्लीत सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या बैठकीदरम्यान, सरकार विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांना ऑपरेशनची माहिती देईल. पक्षीय नेत्यांनी ऑपरेशन सिंदूरचे कौतुक केले आहे आणि दहशतवादाविरुद्ध सशस्त्र दलांच्या कारवाईबद्दल अभिमान व्यक्त केला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सरकारने केलेल्या कोणत्याही कारवाईला विरोधकांनी यापूर्वी पाठिंबा दर्शविला होता.

**शाह-राज्ये**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल पाकिस्तान आणि नेपाळला लागून असलेल्या सीमावर्ती राज्यांच्या उपराज्यपालांना आणि मुख्यमंत्र्यांना समाज तसच इतर माध्यमांमध्ये होणाऱ्या देशविरोधी प्रचारावर कडक नजर ठेवण्यास सांगितलं आहे. काल नवी दिल्ली इथं सुरक्षा आढावा बैठकीचे अध्यक्षपद भूषवताना शाह यांनी राज्य सरकारे आणि केंद्रीय संस्थांशी समन्वय साधून त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले. अनावश्यक भीती पसरवण्याला प्रतिबंध घालावा

त्याचबरोबर अफवांपासून लोकांमध्ये जागरूकता पसरविण्यासाठी पावले उचलावीत असे सांगितले. स्थानिक प्रशासन, लष्कर आणि निमलष्करी दलांमध्ये समन्वय आणखी वाढवण्याच्या सूचनादेखील शहा यांनी दिल्या आहेत. रुग्णालये आणि अग्निशमन दल यासारख्या अत्यावश्यक सेवा सुरळीत चालण्यासाठी व्यवस्था कराव्यात तसेच आवश्यक वस्तूंचा अखंड पुरवठा करता येईल या मुद्याकडेही शाह यांनी लक्ष वेढलं.

**जयशंकर**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी काल स्पेन, जर्मनी, फ्रान्स, कतार आणि जपान या देशांच्या त्यांच्या समपदस्थाबरोबर ऑपरेशन सिंदूर अंतर्गत करण्यात आलेल्या कारवाईबाबत चर्चा केली. पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील नऊ ठिकाणी दहशतवाद्यांना आणि दहशतवादी पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित केलेल्या हल्ल्यांनंतर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनीही अनेक देशांच्या समपदस्थांसोबत चर्चा केली.

**फडणवीस-सिंदूर**

सैन्यदलाच्या या कारवाईनंतर, आता भारताकडे वाकड्या नजरेनं पाहणाऱ्या दहशतवादी संघटना आणि त्यांचे समर्थक पुरेपूर बोध घेतील अशी प्रतिक्रिया महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. या कारवाईचं चित्रीकरण उपलब्ध असल्यानं आता कोणीही पुरावे मागणार नाही असंही फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**जग-सिंदूर**

भारतानं केलेल्या ऑपरेशन सिंदूर बद्दल संपूर्ण जगानं भारताला पाठिंबा दिला आहे. भारताला दहशतवादापासून स्वसंरक्षणाचा अधिकार असल्याचं इस्राएलने म्हटलं आहे.

रशियाच्या परदेश मंत्रालय प्रवक्त्या मारिया झाखारोव्हा यांनी कोणत्याही प्रकरच्या दहशतवादी कृत्याचा रशिया निषेध करत असल्याचं सांगून दहशतवादाचा बीमोड करण्यासाठी जागतिक स्तरावर सहकार्याचं आवाहन केलं आहे.

जपानचे परराष्ट्र मंत्री इवाया ताकेशी यांनी दहशतवादाविरोधातल्या ठाम भूमिकेचा पुनरुच्चार करत, दोन्ही देशांनी संयम ठेवावा, असं आवाहन केलं आहे.

जर्मनी दोन्ही देशांच्या संपर्कात असून त्यांच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानंही शांतता राखण्याचं आवाहन केलं आहे.

संयुक्त अरब अमिरातीचे उपप्रधानमंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद अल नाहयान यांनी भारत आणि पाकिस्तानशी संपर्क साधून शांतता राखण्याचं आवाहन केलं आहे.

कतारचे प्रधानमंत्री शेख मोहम्मद बिन अब्दुर्रहमान बिन जासिम अल थानी यांनी परराष्ट्रमंत्री डॉ. एस जयशंकर यांच्याशी संवाद साधून शांतता आणि संवादाच्या मार्गाने तोडगा काढण्यासाठी मदत देऊ केली आहे.

संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरस यांनी ऑपरेशन सिंदूर नंतर चिंता व्यक्त केली असून दोन्ही देशांनी संयम बाळगावा असं आवाहन केलं आहे.

**अमेरिका-दहशतवाद**

अमेरिकन खासदार राजा कृष्णमूर्ती यांनी पाकिस्तानला भारतासोबतच्या सध्याच्या तणावाचा वापर लोकशाहीला आणखी कमकुवत करण्यासाठी करू नये असे आवाहन केले आहे तर दुसरे खासदार ठाणेदार यांनी भारताने केलेल्या कारवाईला पूर्ण पाठिंबा दिला असून भारताला आपल्या लोकांचे रक्षण करण्याचा अधिकार असल्याचं म्हटलं आहे.

**सीबीआय**

सरकारने सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण विभागाचे संचालक प्रवीण सूद यांचा कार्यकाळ एक वर्षासाठी वाढवला आहे. मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने प्रवीण सूद यांचा कार्यकाळ एक वर्षासाठी वाढवण्यास मान्यता दिली आहे. सूद हे या महिन्याच्या 25 तारखेला निवृत्त होणार होते.

**महिला क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये काल कोलंबो इथं झालेल्या एकदिवसीय सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा महिला संघावर 23 धावांनी विजय मिळवत अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. प्रथम फलंदाजी करताना, भारताने जेमिमा रॉड्रिग्जच्या 123 धावा आणि दीप्ती शर्माच्या 93 धावांच्या जोरावर 337 धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेचा संघ 314 धावा करू शकला. भारताकडून अमनजोत कौरने तीन तर दीप्ती शर्माने दोन बळी घेतले. जेमिमा रॉड्रिग्जला सामनावीर सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. भारताचा अंतिम सामना रविवारी श्रीलंकेविरुद्ध होणार आहे.

**खेलो इंडिया**

खेलो इंडिया युवा स्पर्धेत महाराष्ट्राने 13 सुवर्णपदकांसह 35 पदकांसह पदकतालिकेत वर्चस्व राखले आहे. काल महाराष्ट्राच्या खेळाडूंनी तिरंदाजी, नेमबाजी आणि पोहण्यात चमकदार कामगिरी केली. महाराष्ट्र आशादायक कामगिरीसह अव्वल स्थानावर आहे. 9 सुवर्ण, 3 रौप्य आणि 4 कांस्यपदकांसह 16 पदके जिंकत राजस्थान दुसऱ्या तर कर्नाटक सहा सुवर्ण, 10 रौप्य आणि तीन कांस्य अशा 19 पदकांसाह तिसऱ्या स्थानावर आहे.

**क्रिकेट**

आयपीएल क्रिकेटमध्ये काल चेन्नई सुपर किंग्जने कोलकाता नाईट रायडर्सचा दोन गडी राखून पराभव केला. कोलकाताने 180 धावांचे लक्ष्य ठेवले होते. चेन्नईने 2 चेंडू राखत हे उद्दिष्ट साध्य केलं. तर रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून तात्काळ निवृत्तीची घोषणा केली आहे. समाज माध्यमांवर त्याने हा निर्णय जाहीर केला आहे. मात्र तो एकदिवसीय सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत राहणार आहे. रोहितने 67 कसोटी सामन्यांमध्ये 40 पूर्णांक 57 च्या सरासरीने 12 शतके आणि 18 अर्धशतकांसह 4301 धावा केल्या आहेत.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.